**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या इस्त्राइल दौऱ्यात विविध विषयांवर सामंजस्य करार
- रेल्वेच्या कामकाजात अधिकाधिक तंत्रज्ञान वापरासाठीच्या धोरणाची रेल्वेमंत्र्यांकडून घोषणा
- न्यायंत्रणेतल्या भ्रष्टाचाराचा उल्लेख असलेल्या NCERTच्या पुस्तकावर सर्वोच्च न्यायालयाकडून बंदी
- विमान प्रवाशांना तिकीट आरक्षित केल्यावर ४८ तासात अतिरीक्त शुल्काशिवाय रद्द करण्याची सुविधा मिळणार

**आणि**

- टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा झिम्बॉव्बेचा निर्णय

**<><><><><><>**

भारत आणि इस्त्रायल यांच्यात आज विविध क्षेत्रांमधले सामंजस्य करार झाले. सांस्कृतिक देवाण-घेवाण, भू-भौतिक अन्वेषण, मत्स्योद्योग आणि जलशेती, युपीआय आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन शिक्षण सुधारणा इत्यांदी क्षेत्रांचा यात समावेश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आमि इस्त्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेत्यान्यू यांच्यात झालेल्या शिष्टमंडळस्तरीय चर्चेनंतर हे सामंजस्य करार करण्यात आले. भारत आणि इस्त्रायल यांच्यातले संबंध गाढ विश्वास, सामायिक लोकशाही मूल्यं, आणि मानवी संवेदनशीलतच्या पायावर उभे आहेत, असं मोदी यांनी प्रसारमाध्यमांसाठीच्या निवेदनात म्हटलं आहे.

**होल्ड प्रधानमंत्री बाइट**

दोन्ही देशांना आपल्या प्राचिन संस्कृतीचा आणि इतिहासाचा अभिमान आहे, पण भविष्याचा वेध घेण्याचा दोन्ही देशांचा निर्धार असून आम्ही एकत्रिपणे ते नक्कीच करु, असं नेत्यान्यू यांनी सांगितलं. प्रधानमंत्री मोदी इस्रायल दौरा आटोपून आता मायदेशी निघाले आहेत.

**<><><><><><>**

प्रस्तावित मुक्त व्यापार करारासाठी भारत आणि इस्रायल यांच्यात चर्चेची पुढची फेरी मे महिन्यात होणार आहे. या चर्चेची पहिली चार दिवसीय फेरी नवी दिल्ली इथं पूर्ण झाल्यावर आज परराष्ट्र मंत्रालयानं ही माहिती दिली. वस्तू आणि सेवा, उत्पादनाच्या आर्थिक राष्ट्रीयत्वाबाबतचे नियम आणि कायदे, स्वच्छता तसंच वनस्पतींच्या संरक्षणाबाबतचे कायदे आणि नियम, व्यापारातले तांत्रिक अडथळे, बौद्धिक संपदा हक्क, डिजिटल ट्रेड, आणि इतर महत्वाच्या मुद्यांवर दोन्ही देश चर्चा करत असल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

**<><><><><><>**

रेल्वेमध्ये मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचा वापर करण्यासंदर्भात रेल टेक पॉलिसी तसंच प्रवाशांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी ई-रेल्वे क्लेम्स ट्रिब्युनलची घोषणा केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली.

**होल्ड - अश्विनी वैष्णव**

येत्या वर्षभरात ५२ आठवड्यात ५२ सुधारणा या भारतीय रेल्वेच्या धोरणांतर्गत वैष्णव यांनी आज नवी दिल्ली इथं एका पत्रकार परिषदेत या दोन सुधारणा जाहीर केल्या.

**<><><><><><>**

न्यायंत्रणेतल्या भ्रष्टाचाराचा उल्लेख असलेलं NCERTच्या आठवीच्या अभ्यासक्रमातल्या पुस्तकावर सर्वोच्च न्यायालयानं बंदी घातली आहे. न्याययंत्रणेला बदनाम करण्याचं षड्यंत्र यामागे असल्याची शंकाही व्यक्त

न्यायालयानं व्यक्त केली. पुस्तकाच्या सर्व मुद्रित प्रती जप्त करण्याचे आणि त्याच्या डिजिटल आवृत्त्या तात्काळ हटवण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणी न्यायालयानं एनसीईआरटीच्या संचालकांना तसंच शालेय शिक्षण मंडळाला कारणे दाखवा नोटीसही बजावली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनीही याप्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पुस्तकाच्या निर्मितीसाठी जबाबदार असलेल्यांवर कारवाई केली जाईल असंही प्रधान यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

जबाबदारीने वाहन चालवायला प्रोत्साहन देण्यासाठी आणि रस्ते अपघात रोखण्यासाठी सरकार श्रेणी आधारित चालक परवाना यंत्रणा सुरू करणार आहे, अशी माहिती  केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत सीआआयने आयोजित केलेल्या राष्ट्रीय रस्ते सुरक्षा परिषदेला संबोधित करत होते.

**<><><><><>**

प्रक्रिया केलेले अन्न हानिकारक असल्याच्या अफवा समाज माध्यमांवर पसरवल्या जात आहेत. त्याचा विरोध करण्याचं आवाहन अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांनी आज नवी दिल्लीत केलं. या खोट्या बातम्यांमुळे या क्षेत्राच्या प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होत आहे. याकरिता मंत्रालयामार्फत समितीचीही स्थापना करण्यात आली असून उद्योग क्षेत्रालाही याबाबत जबाबदारी घेण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

विमान प्रवाशांना आता तिकीटं आरक्षित केल्यानंतर ४८ तासांच्या आत अतिरिक्त शुल्क न भरता ती रद्द करता किंवा बदलता येतील, असं डीजीसीएनं म्हटलं आहे. यासाठी काही अटींची पूर्तता प्रवाशांना करावी लागेल. देशांतर्गत प्रवासाला ७ दिवस आणि आंतरराष्ट्रीय प्रवासाला १५ दिवसांपेक्षा कमी कालावधी शिल्लक

असेल तर हे नियम लागू होणार नाहीत. विमान कंपनीच्या संकेतस्थळावरून तिकीट आरक्षित केल्यानंतर २४ तासांच्या आत प्रवाशाने त्रुटी निदर्शनाला आणून दिल्या तर विमान कंपन्यांनी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारता येणार नाही. मात्र, एजंट किंवा पोर्टलच्या माध्यमातून तिकीट आरक्षित केलं तर पुढच्या १४ कार्यालयीन दिवसांच्या आत परतफेडीची जबाबदारी विमान कंपन्यांवर असेल, असं विभागाने स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र ही देशातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून २०३२ मध्ये राज्य एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरच्या चर्चेला ते आज उत्तर देत होते. राज्याची अर्थव्यवस्था गेल्या अकरा वर्षांत १३ लाख कोटींवरून वाढून ५१ लाख कोटींवर गेली आहे. तसंच महाराष्ट्र तीस लाख कोटींचं जीएसटी संकलन करतो, असं मुख्यमंत्री म्हणाले. दावोस मध्ये झालेल्या करारांपैकी ७५ टक्के करारांची अंमलबजावणी होते. २०२५ मध्ये झालेल्या करारांपैकी ८२ टक्के करारांची अंमलबजावणी होत आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. देशातील एकूण परकीय गुंतवणुकीच्या ३९ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात होते असं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

राज्यातल्या तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी २०२६ हे वर्ष भरती वर्ष म्हणून राबवलं जाणार आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावरच्या चर्चेला ते विधानपरिषदेत उत्तर देत होते. राज्यात नवी औद्योगिक क्रांती होत असून राज्याच्या विकासाची गती आता कुणीही थांबवू शकत नाही, असं ते म्हणाले. विकास हा फक्त मुंबई-पुण्यापर्यंत मर्यादित न ठेवता औद्योगिक विकासाचं विकेंद्रीकरण करण्यात आलं आहे, असं त्यांनी

सांगितलं. विरोधकांनी जनतेचे प्रश्न मांडावेत, जनतेला न्याय द्यावा, पण ते केवळ विरोधाला विरोध करत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

<><><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी  सुनेत्रा पवार यांची निवड झाली आहे. पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी आज मुंबईत झालेल्या पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात ही घोषणा केली.  प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला, याला सुनील तटकरे यांनी अनुमोदन दिलं आणि एकमताने त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली. आगामी राज्यसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पार्थ पवार यांच्या उमेदवारीची घोषणा प्रफुल्ल पटेल यांनी केली.

<><><><><><>

उद्योगपती अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशनविरोधात सीबीआयनं आणखी एक गुन्हा दाखल केला आहे. बँक ऑफ बडोदाबरोबरच्या व्यवहारांमध्ये २ हजार २२० कोटी रूपयांची फसवणूक केल्याबद्दल हा गुन्हा आहे. याप्रकरणी एफआयआर नोंदवल्यानंतर सीबीआयनं अंबानींच्या निवासस्थानाची आणि कंपनीच्या कार्यालयाची झडती घेतली आहे.

<><><><><><>

टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर एट च्या पहिल्या गटात आज चेन्नईत भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात सामना सुरू आहे. झिम्बाब्वेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १४ षटकांत ३ बाद १६१ धावा झाल्या होत्या.

भारताला उपान्त्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी आजचा सामना तसंच येत्या रविवारचा वेस्ट इंडिजबरोबरचा सामना या दोन्हीमध्ये विजय मिळवणं आवश्यक आहे.

//<><><><><><>//